# पोलीस अधीक्षक कार्यालय
# बुलढाणा

## पोलीस ठाणे जळगाव जामोद यांची धडाकेबाज कामगीरी, गांज्याची शेती उध्वस्त

वाढत्या गुन्हयांना आळा घालणेकामी बुलढाणा पोलीस सदैव तत्पर आहेत. बुलढाणा पोलीसांनी विविध किचकट गुन्हांचा तपास करुन गुन्हेगारांना कठोर शासन केले आहे. यामुळे गुन्हेगारांना मध्ये पोलीसांचा वचक राहुन गुन्हयांचे प्रमाण कमी होण्यास मदत झाली आहे. असाच एक उत्कृष्ट तपास जळगाव जामोद पोलीसांनी केला आहे.

दिनांक ०३/११/२४ रोजी पो.स्टे. जळगांव जामोद यांना मिळालेल्या गुप्त माहिती नुसार पोलीस निरीक्षक श्रीकांत निचळ, प्रभारी अधिकारी पोलीस स्टेशन जळगांव जामोद व पोलीस स्टाफ असे सरकारी वाहनाने भिंगारा शिवारातील शेतात गेले असता त्यांना आरोपी १) हिरालाल मांगीलाल वास्कले वय ६० वर्ष २) अनिल हिरालाल वास्कले वय ३० वर्ष दोन्ही रा. भिंगारा यांचे शेतात गांज्याची रोपे संगोपन केलेले आढळून आली असता लागलीच सरकारी पंचासमक्ष त्यांनी गांजाची अवैध लागवड केलेल्या आरोपीतांचे शेतातून ४५०० किलो ओलसर गांज्याची झाडे किं.४,५००००/-रु, वाळलेला ओलसर गांजा किं.१०००००/-रु, इंजीन व प्लॅस्टीक पाईप किं. ११०००/-रु असा एकुण ४,५१,११,०००/-रु चा माल पंचनामा करुन जप्त केला. फिर्यादी पो.उप.नि पंकज जगन्नाथ सपकाळे यांचे तक्रारवरुन अप.क्र. ६२७/२०२४ क्र.२०, २९, NDPS ACT, सहकलम ३(५) भा.न्या.सं. प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.